# Report

## Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj National Documentary Film Festival-2023

**Preparation and planning:**
To commemorate the 100$^{th}$ death of Rajarshi Chhatrapati Shahu Maharaja, the department of Journalism and Mass Communication of Shivaji Universtiy, Kolhapur had organized national-level documentary film festival. In the month of February 2023, the detailed notification, instructions, guidelines and the rules-regulations were published on print media and social platforms to ask the participation entries in the competition. For digital marketing purpose, digital materials like posters, flyers were designed and circulated though social media platforms also student's team identified and assigned responsibilities accordingly:

**Convenor:** Prof. Dr. Nisha Pawar
(Head, Dept.Journalism and Mass Communication,Shivaji University Kolhapur)

**Faculty coordinators:** Dr.Sumedha Salunkhe
Parasharam Pawar

**Student Coordinators :** Chetan Suryawanshi
Vivek Rajvardhan
Minal Bhalkar

**Invited Jury:** Dr.Anmol Kothadiya (Senior Film Critics)
Anup Jatratkar ( Film Director)

**Anchor:** Pallavi patil
Javed Tamboli

**Awards: First Prize:** Rs. 10,000/-
**Second Prize:** Rs. 7000/-
**Special Jury Award:** Rs. 2000
**Consolation Prizes:**
- ✓ Best Cinematography: Rs. 1000/-
- ✓ Best Editing: Rs. 1000/-
- ✓ Best Sound: Rs. 1000/-

**Entries:** There were 19 documentaries were submitted for the competition on following suggested themes:

- ✓ Shahu Maharaaj as a Social Reformer
- ✓ Shahu Maharaaj and Swarajya Movement
- ✓ Shahu Maharaja's Educational Contribution
- ✓ Shahu Maharaja and Women Empowerment
- ✓ Shahu Maharaja's Contribution to Agriculture, Industry and Cooperative Sector
- ✓ Shahu Maharaja and Dr.Babasaheb Ambedkar
- ✓ Shahu Maharaja's Contribution to Art,Culture, Sports
- ✓ Potrayal of Shahu Maharaja in Films

**Documentary Festival: 11th May 2023**

As per the schedule, Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj National Documentary Film Festival-2023 held on 11th May 2023 at 11.00am at humanities auditorium of Shivaji University Kolhapur. Pro.Vice Chancellor Prof. Dr .P .S. Patil was invited as president of the inaugural function of the festival also Ag. Registrar Dr .V. N .Shinde grace the function. During the function, award winning five documentaries were screened and award winners were honoured with Shivaji University emblem, cash prizes and certificate by Pro-Vice Chancellor.

On the occasion, Pro-Vice Chancellor Prof. Dr. P. S. Patil, and Ag.Registrar Dr.V. N. Shinde was delivered their views about the Rajarshi Chhatrapati Shahu Maharaja. Invited jury Dr. Anmol Kothadiya and Mr.Anup Jatratkar were shared their views on documentary. Nearly 100 students, faculties, media professionals, film critics and film makers were attended the festival.

**Award winning documentaries:**

- ➢ **First Prize: 'Kolhapur to Miraj Railway' (Mr.Chetan Suryavanshi)**
- ➢ **Second Prize:** 'Sathmari' (Samrudhi Patil)
- ➢ **Special Jury Award:** 'Motibag Talim' (Sonali humbare)
- ➢ **Consolation Prizes:**
- ✓ **Best Cinematography:** 'Lakshmi Vilas Palace' (Simran Thanekar
- ✓ **Best Editing:** 'Vichar Shashwat Vasatigruhancha' (Pallavi Patil)
- ✓ **Best Sound:** 'Motibag Talim' (Sonali humbare)

**News in daily news paper to invite entries for the festival**

**Daily Pudhari, 19th March 2023**

पुढारी

## शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय माहितीपट महोत्सवाचे आयोजन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्ष महोत्सवानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम व मास कम्युनिकेशन अधिविभागातर्फे दि. २७ व २८ एप्रिलरोजी मानव्यशास्त्र सभागृहात 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय माहितीपट महोत्सवा'चे आयोजन केले आहे.

स्पर्धेत सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी नोंदणी अर्ज, महाविद्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र तसेच मेल ड्राईव्हच्या माध्यमातून माहितीपटाची क्लिप journalism@unishivaji.ac.in या ई-मेल आयडीवर १७ एप्रिलपर्यंत पाठवणे आवश्यक आहे. महोत्सवात महाविद्यालयीन, विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थी सहभाग घेऊ शकतील.

महोत्सवाची मध्यवर्ती संकल्पना, सुचविलेले विषय, नियम, अटी, नोंदणी अर्ज नमुना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर http:///www.unishivaji.ac.in उपलब्ध आहे. स्पर्धेतील विजेत्यांना विविध स्वरूपाची पारितोषिके, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याची माहिती प्रा. डॉ. निशा पवार यांनी दिली.

Kolhapur Edition
Mar 19, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

**Daily Lokmat, 18th March 2023**

## राजर्षी माहितीपट महोत्सवात सहभागाचे आवाहन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन अधिविभागातर्फे 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय माहितीपट महोत्सव' २७ व २८ एप्रिलला होत आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्ष महोत्सवानिमित्त त्याचे आयोजन केले आहे. मानव्यशास्त्र सभागृहात हा महोत्सव होईल. महोत्सवात महाविद्यालयीन, विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थी सहभाग घेऊ शकतील. इच्छुकांनी नोंदणी अर्ज, महाविद्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र मेल ड्राईव्हच्या माध्यमातून माहितीपटाची क्लिप journalism@unishivaji.ac.in मेलवर १७ एप्रिल सायंकाळी पाच वाजेपर्यंत पाठवावी. महोत्सवात प्रवेशासाठी नोंदणी करणे आवश्यक असून प्रवेश निःशुल्क आहे. महोत्सवाची मध्यवर्ती संकल्पना, सुचविलेले विषय, नियम, अटी तसेच नोंदणी अर्ज नमुना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर http://www.unishivaji.ac.in उपलब्ध आहे. महोत्सवात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रवास व इतर खर्च स्वतः करायचा आहे. अधिक माहितीसाठी सह-समन्वयक डॉ. सुमेधा साळुंखे व परशराम पवार यांच्याशी विभागाच्या journalism@unishivaji.ac.in मेलवर संपर्क साधावा, असे आवाहन अधिविभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

**Daily Sakal, 18th April 2023**

## माहितीपट महोत्सवातील सहभाग नोंदणीसाठी मुदतवाढ

कोल्हापूर, ता. १८ : राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन विभागातर्फे 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज माहितीपट महोत्सव २०२३'चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवानिमित्त शाहू महाराजांच्या योगदानावर माहितीपट निर्मिती स्पर्धा होणार आहे. त्यातील सहभागासाठी नोंदणीसाठी ४ मे रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. महोत्सव तांत्रिक कारणांमुळे २७ आणि २८ एप्रिल ऐवजी ११ आणि १२ मे रोजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात होणार आहे. स्पर्धेमध्ये सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी नोंदणी अर्ज, माहितीपटाची क्लिप journalism@unishivaji.ac.in या मेलआयडीवर ४ मे रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत पाठवावेत, असे आवाहन प्रा. डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

**Workshop on Historical documentary Production**



**Workshop News Published in the News Paper**

**Daily Pudhari, 09th May 2023**

पुढारी

# पत्रकारिता जनसंवाद विभागातर्फे विद्यापीठात आजपासून कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ पत्रकारिता व जनसंवाद अधिविभागाच्या वतीने दि. १० व ११ एप्रिल रोजी 'ऐतिहासिक माहितीपट निर्मिती : राजर्षी छत्रपती शाहू महाराज विशेष संदर्भ' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यशाळेंतर्गत सोमवारी पुराभिलेख अधिकारी गणेशकुमार खोडके 'समाजाच्या सर्वांगीण विकासाची दूरदृष्टी असणारा राजा : राजर्षी छत्रपती शाहू महाराज', दै.'पुढारी' प्रयोग सोशल फकंडेशनचे विक्रम रेपे 'ऐतिहासिक माहितीपट निर्मिती : राजर्षी छत्रपती शाहू महाराज विशेष संदर्भ' या विषयावर मार्गदर्शन करतील. दि. ११ रोजी 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज : संदर्भ साहित्य' विषयावर डॉ. निलांबरी जगताप; जिल्हा माहिती अधिकारी वृषाली पाटील 'राजर्षी शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रम रूपरेषा' विषयावर विचार मांडतील. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

**Daily Lokmat, 5th April 2023**

लोकमत

# शाहू महाराज : माहितीपट निर्मिती कार्यशाळेला प्रतिसाद

**कोल्हापूर** : राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता आणि जनसंवाद अधिविभागाच्या वतीने आयोजित केलेल्या 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज माहितीपट महोत्सवा'ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

'राजर्षी छत्रपती शाहू महाराज : ऐतिहासिक माहितीपट निर्मिती' या विषयावरील दोनदिवसीय विशेष कार्यशाळा विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात पार पडली. कोल्हापूर पुरालेखागाराचे अधिकारी गणेशकुमार खोडके यांनी याचे उद्घाटन केले. प्रथम सत्रात खोडके यांनी शाहू महाराजांचे आदर्श हे शिवाजी महाराज होते, याचे अनेक पुरावे आजही कोल्हापूर अभिलेखागारामध्ये उपलब्ध आहेत असे सांगून, शिवाजी महाराजांच्या सुमारे २३१ पत्रांपैकी ३१ पत्रे कोल्हापूर अभिलेखागारात उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. दुसऱ्या सत्रात निवेदक विक्रम रेपे यांनी 'माहितीपटाची निर्मितीप्रक्रिया व माहितीपटांचे विषय' यावर मार्गदर्शन केले.

Hello Kolhapur
Page No. 5 Apr 13, 2023
Powered by: erelego.com

**Daily Tarun Bharat, 5th April 2023**

# शाहू महाराजांमुळे कोल्हापूर विद्येचे माहेरघर

## पुराभिलेख अधिकारी गणेशकुमार खोडके यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी / कोल्हापूर

ज्या समाजात शिक्षणाचा फारसा वारसा नव्हता आणि परंपरांनी त्यांना शिक्षणाचा हक्क नाकारला होता अशा काळात महाराष्ट्रात कोल्हापूर विद्येचे माहेरघर झाले. कोल्हापूर आणि या माहेरघराचा पाया राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी घातला. त्यांनी युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची प्रेरणा घेऊन राज्यकारभार केला, असे प्रतिपादन येथील पुराभिलेख अधिकारी गणेशकुमार खोडके यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील पत्रकारिता व जनसंवाद अधिविभागाच्या वतीने आयोजित राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या संदर्भाने ऐतिहासिक माहितीपट कार्यशाळेत ते प्रमुख उद्घाटक म्हणून बोलत होते.



कोल्हापूर : पुराभिलेख अधिकारी गणेशकुमार खोडके यांचा सत्कार करताना डॉ. निशा पवार, सोबत विक्रम रेपे, डॉ. सुमेधा साळुंखे, परशराम पवार.

शिवाजी विद्यापीठातील पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या वतीने ऐतिहासिक माहितीपट निर्मिती राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनावर आधारित दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. १० आणि ११ एप्रिल या दोन दिवस चालणाऱ्या या कार्यशाळेचे उद्घाटन गणेशकुमार खोडके आणि निवेदक विक्रम रेपे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

'समाजाच्या सर्वांगीण विकासाची दूरदृष्टी असणारा राजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज" या विषयावर बोलताना खोडके म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची प्रेरणा घेऊन राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी राज्यकारभार केला. कोल्हापूर संस्थानात १९०२ मध्ये पहिल्यांदा आरक्षणाचा जाहिरनामा काढला. शाहू महाराजांनी कोल्हापुरात विद्येच्या माहेरघराचा पाया घातला आणि १९१७ मध्ये सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केला. त्यातून बहुजनांच्या पिढ्या शिक्षणाच्या प्रवाहात आल्या. समृद्ध आणि विकसित झाल्या. विक्रम रेपे यांनी माहितीपट कसे बनवावेत? याविषयी तांत्रिक मार्गदर्शन केले. प्रास्ताविक आणि स्वागत विभाग प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी केले. आभार प्रा. परशुराम पवार यांनी मानले. यावेळी डॉ. सुमेधा साळुंखे, विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

**Daily Pudhari, 13th April 2023**

पुढारी

# शाहू महाराजांनी शिवरायांच्या प्रेरणेतून समाजाचा सर्वांगीण विकास घडविला

**• गणेशकुमार खोडके यांचे प्रतिपादन**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राजर्षी शाहू महाराजांचे आदर्श हे छत्रपती शिवाजी महाराज होते. स्वतः ते शिवरायांच्या प्रेरणेतून समाजाच्या सर्वांगीण विकास घडवण्यासाठी सतत प्रयत्नशील राहिले, असे प्रतिपादन कोल्हापूर पुरालेखागारचे अधिकारी गणेशकुमार खोडके यांनी केले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठ पत्रकारिता आणि जनसंवाद अधिविभागातर्फे 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज : ऐतिहासिक माहितीपट निर्मिती' याविषयावर दोन दिवसीय विशेष कार्यशाळा झाली. प्रथम सत्रात खोडके म्हणाले, शिवाजी महाराजांची २३९ पत्रे उपलब्ध आहेत. त्यापैकी ३९ पत्रे कोल्हापूर अभिलेखागारात उपलब्ध आहेत. याशिवाय राजर्षी शाहू महाराजांची अनेक प्रशासकीय कागदपत्रे, ठराव, पत्रे अभिलेखागारात उपलब्ध असून, अनेक ऐतिहासिक घटना आणि निर्णयांचा संदर्भ देत, विद्यार्थ्यांनी माहितीपट निर्मितीसाठी संदर्भ म्हणून त्यांचा वापर करावा.

दुसऱ्या सत्रात प्रसिद्ध निवेदक विक्रम रेपे यांनी 'माहितीपटाची निर्मिती प्रक्रिया व माहितीपटांचे विषय' यावर मार्गदर्शन केले. त्यांनी अनेक शाहूकालीन वास्तू उपलब्ध असल्याचे सांगत, आजही अस्तित्वात असणारे अनेक भौतिक पुरावे निदर्शनास आणून दिले. डॉ. निलांबरी जगताप, जिल्हा माहिती अधिकारी, वृषाली पाटील यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी केले. व्याख्यात्यांची ओळख डॉ. सुमेधा साळुंखे यांनी करून दिली. अश्विता इंगळे यांनी सूत्रसंचालन केले. परशराम पवार यांनी आभार मानले.


My Kolhapur Edition
Apr 13, 2023 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

**Banner and Poster**






# Invitation


Shivaji University, Kolhapur
Estd-1962 – recognised by UGC U/s 2(f) and 12 (B)
NAAC "A++" Grade with CGPA 3.52
Department of Journalism
& Mass Communication
Organised
Chhatrapati Rajarshi Shahu Maharaja
National Documentary Film Festival 2023
Award Distribution Ceremony
Prof. Dr. P. S. Patil
Pro Vice Chancellor,
Shivaji University, Kolhapur
Dr. V. N. Shinde
Registrar,
Shivaji University, Kolhapur
Convener
Prof. Dr. Nisha Pawar
Senior Professor and Head,
Dept. of Journalism & Mass Communication
Thursday, 11 May 2023 At 10.00 am
Venue : Humanities Auditorium, Shivaji University, Kolhapur



**Documentary winners and dignitaries at Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj National Documentary Film Festival-2023**



**Documentary winners, participants and dignitaries at Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj National Documentary Film Festival-2023**

## Welcoming of Invited Dignitaries



**Pro-VC Prof. Dr. P. S. Patil , SUK**



**Ag. Registrar Dr. V. N. Shinde, SUK**



**Dr. Anmol Kothadia , Senior Film Critics)**



**Mr.Anup Jatratkar , Film Director**

# Felicitation and Prize Distribution Ceremony



**Prize distribution:** Chetan Suryavanshi
(**Documentary:** Kolhapur to Miraj Railway)



**Prize distribution:** Samrudhi Patil
(**Documentary:** Sathmari)

Rajarshi Chhatrapati Shahu Maharaja National Documentary Film Festival 2023



**Prize distribution:** Simran Thanekar
(**Documentary:** Lakshmi Vilas Palace)



**Prize distribution:** Pallavi Patil
(**Documentary:** Vichar Shashwat Vasatigruhancha)

## Media Coverage of the Festival

**Daily Sakal, 12th May 2023**

# माहितीपटांतून उलगडले राजर्षी शाहूंचे कार्य




**कोल्हापूर, ता. ११ :** राजर्षी शाहू महाराज स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त विद्यापीठाच्या जर्नालिझम अँण्ड मास कम्युनिकेशन विभागातर्फे 'राजर्षी शाहू महाराज राष्ट्रीय माहितीपट महोत्सव' झाला. मानव्यशास्त्र सभागृहातील या महोत्सवात शाहू महाराजांच्या योगदानावर प्रकाश टाकणारे १९ माहितीपट नोंदविण्यात आले होते. विजेत्या पाच माहितीपटांचे स्क्रीनिंग झाले. विजेत्यांना प्रथम, द्वितीय, विशेष परीक्षक पुरस्कार, छायाचित्रण, संकलन आणि ध्वनी अशा स्वरूपाची पारितोषिके, विद्यापीठाचे सन्मानचिन्ह, रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील अध्यक्षस्थानी होते. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित होते.

चेतन सूर्यवंशी यांच्या 'कोल्हापूर ते मिरज रेल्वे' या माहितीपटास प्रथम, समृद्धी पाटील यांच्या 'साठमारी'ला द्वितीय, सोनाली हुंबे यांच्या 'मोतीबाग तालीम'ला विशेष परीक्षक पुरस्कार व उत्कृष्ट ध्वनी अशी पारितोषिके देण्यात आली. सिमरन ठाणेकर यांच्या 'लक्ष्मी-विलास पॅलेस' आणि पल्लवी पाटील यांच्या 'विचार शाश्वत वसतिगृहांचा' या माहितीपटांना अनुक्रमे उत्कृष्ट छायाचित्रण, संकलन पारितोषिके मिळाली. प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, की राजर्षी शाहू महाराज हे आदर्श नेतृत्वाचे प्रतीक आहेत. या महोत्सवाच्या माध्यमातून शाहूंचे योगदानाचा जागर निश्चित घडून आला आहे. चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठाडिया, दिग्दर्शक अनुप जत्राटकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. महोत्सव यशस्वी करण्यासाठी डॉ. शिवाजी जाधव, सुमेधा साळुंखे, परशराम पवार यांनी परिश्रम घेतले. आयोजक डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. पल्लवी पाटील व जावेद तांबोळी यांनी सूत्रसंचालन केले.

**'विद्यार्थ्यांचे कौतुक'**

प्रभारी कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, की लोकोत्तर व्यक्तींचे कर्तृत्व महान असते. निःस्वार्थ भावनेतून समाजहिताचे कार्य अशा व्यक्तींकडून होत असते. असे व्यक्तिमत्त्व म्हणजे शाहू महाराज होत. अशा सर्वगुण संपन्न व्यक्तिमत्त्वांवर माहितीपट निर्मितीचे काम विद्यार्थ्यांनी केल्याबद्दल सर्वांचे कौतुक आहे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू माहितीपट महोत्सवातील चेतन सूर्यवंशी, समृद्धी पाटील, पल्लवी पाटील व सिमरन ठाणेकर या विजेत्यांना कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. डॉ. निशा पवार, शिवाजी जाधव, अनुप जत्राटकर, अनमोल कोठाडिया, सुमेधा साळुंखे, जगदीश गुरव, परशराम पवार उपस्थित होते.**

**Daily Lokmat, 12th May 2023**

**लोकमत**

# 'कोल्हापूर ते मिरज रेल्वे' माहितीपटाची बाजी

## साठमारी द्वितीय : शिवाजी विद्यापीठात माहितीपट महोत्सव उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन विभागातर्फे गुरुवारी (दि. ११) आयोजित केलेल्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय माहितीपट महोत्सवात चेतन सूर्यवंशी यांच्या 'कोल्हापूर ते मिरज रेल्वे' या माहितीपटाने प्रथम क्रमांक पटकावला.

मानव्यशास्त्र सभागृहात पार पडलेल्या या महोत्सवात शाहू महाराजांच्या योगदानावर प्रकाश टाकणारे १९ माहितीपट नोंदविले होते. विजेत्या पाच माहितीपटांचे स्क्रीनिंग यावेळी झाले. विजेत्यांना सन्मानचिन्ह, रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविले. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील अध्यक्षस्थानी होते, तर प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रामुख्याने उपस्थित होते. महोत्सवात समृद्धी पाटील यांच्या 'साठमारी'ला द्वितीय, सोनाली हुंबरे यांच्या 'मोतीबाग तालीम'ला विशेष परीक्षक पुरस्कार व उत्कृष्ट ध्वनी अशी पारितोषिके देण्यात आली. सिमरन ठाणेकर यांच्या 'लक्ष्मी-विलास पॅलेस' व पल्ल[वी] पाटील यांच्या 'विचार शाश्[वत] वसतिगृहांचा' या माहितीपटां[ना] अनुक्रमे उत्कृष्ट छायाचित्रण [व] उत्कृष्ट संकलन पारितोषिके मिळाल[ी]. या महोत्सवासाठी चित्रपट समीक्ष[क] डॉ. अनमोल कोठाडिया व दिग्दर्श[क] अनुप जत्राटकर यांनी परीक्षक म्हणू[न] काम पाहिले. महोत्सवाच्या आयोज[क] डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक के[ले]. महोत्सव यशस्वी करण्यासाठी [डॉ.] शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुं[खे], परशराम पवार यांनी परिश्रम घेत[ले]. पल्लवी पाटील व जावेद तांबोळी यां[नी] सूत्रसंचालन केले.



**विद्यापीठात पार पडलेल्या राजर्षी शाहू माहितीपट महोत्सवातील विजेत्यांना कुलसचिव डॉ. विलास शिंदे व विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. यावेळी (डावीकडून) विक्रम रेपे, डॉ. शिवाजी जाधव, अनुप जत्राटकर, अनमोल कोठाडिया, डॉ. सुमेधा साळुंखे, आदी उपस्थित होते.**

Hello Kolhapur
Page No. 3 May 12, 2023
Powered by: erelego.com

**Daily Punya nagari, 12th May 2023**

पुण्य नगरी

# विद्यापीठात राजर्षी छत्रपती शाहू महाराज माहितीपट महोत्सव

## माहितीपटांतून उलगडले शाहूंचे कार्य; 'कोल्हापूर ते मिरज रेल्वे' ठरला सर्वोत्कृष्ट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन विभागातर्फे राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्षानिमित्त 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय माहितीपट महोत्सव २०२३'चे गुरुवारी आयोजन करण्यात आले होते.



माहितीपट महोत्सवातील पुरस्कार विजेत्यांसह प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, अनुप जत्राटकर, अनमोल कोठाडिया, डॉ. विलास शिंदे, डॉ. निशा पवार.

विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात झालेल्या या महोत्सवात शाहू महाराजांच्या योगदानावर प्रकाश टाकणारे १९ माहितीपट नोंदवले होते. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील अध्यक्षस्थानी होते, तर प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित होते.

विजेत्या पाच माहितीपटांचे स्क्रीनिंग यावेळी करण्यात आले. महोत्सवातील विजेते अनुक्रमे, चेतन सूर्यवंशी यांचा 'कोल्हापूर ते मिरज रेल्वे', समृद्धी पाटील यांचा 'साठमारी' असे आहेत. सोनाली हुंबरे यांचा 'मोतीबाग तालीम'ला विशेष परीक्षक पुरस्कार व उत्कृष्ट ध्वनी अशी पारितोषिके देण्यात आली. सिमरन ठाणेकर यांच्या 'लक्ष्मी-विलास पॅलेस' व पल्लवी पाटील यांच्या 'विचार शाश्वत वसतिगृहांचा' या माहितीपटांना अनुक्रमे उत्कृष्ट छायाचित्रण व उत्कृष्ट संकलन पारितोषिके मिळाली.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. महोत्सवाच्या आयोजक डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. महोत्सवासाठी चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठाडिया, दिग्दर्शक अनुप जत्राटकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

महोत्सव यशस्वी करण्यासाठी डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, परशराम पवार यांनी परिश्रम घेतले. पल्लवी पाटील व जावेद तांबोळी यांनी सूत्रसंचालन केले.

Rajarshi Chhatrapati Shahu Maharaja National Documentary Film Festival 2023

# Prepared by:

Department of Journalism and Mass Communication
Shivaji University, Kolhapur